स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०-२५६२२६८८/८९
: ०२०-२५६२२६९०/९१
: ०२०-२५६२२६९२
: ०२०-२५६९७३४१

रासेयो/२०२५-२६/२८४ दि. १०/१०/२०२६

**प्रति,**
**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी**
**रासेयो संलग्नीत महाविद्यालये**
**फक्त पुणे व पिंपरी-चिंचवड शहर**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : महिला सबलीकरण व सक्षमीकरण उपक्रमांतर्गत 'जागर : स्त्रीशक्तीचा' एक दिवसीय उपक्रमाकरिता महिला कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेविका यांनी नावनोंदणी करणेबाबत व उपस्थित राहणेबाबत...**

महोदय/महोदया,

महिला सबलीकरण आणि सक्षमीकरण म्हणजे महिलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आणि कायदेशीर दृष्ट्या मजबूत करून त्यांना स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याचे स्वातंत्र्य देणे. एखादा समाज किंवा देश तेव्हाच प्रगती करू शकतो, जेव्हा त्या देशातील महिला पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात सक्षम आणि स्वावलंबी होतील. या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महिला सबलीकरण व सक्षमीकरण उपक्रमांतर्गत 'जागरः स्त्रीशक्तीचा' एक दिवसीय उपक्रम दिनांक १६ ऑक्टोबर, २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला आहे.

सदर एकदिवसीय उपक्रमामध्ये पुणे शहरातील रासेयो संलग्नीत महाविद्यालयातील उपस्थित महिला कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेविका यांच्याकरिता महिला सबलीकरण व सक्षमीकरणासाठी व्याख्यान, चचासत्र आयोजित करण्यात आलेले आहे. यामध्ये पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील १५० महिला सहभागी होणार आहेत.

तरी **महिला सबलीकरण व सक्षमीकरण उपक्रमांतर्गत 'जागर : स्त्रीशक्तीचा' एक दिवसीय उपक्रमामध्ये सहभागी होण्याकरिता** आपल्या महाविद्यालयातील महिला कार्यक्रम अधिकारी व १ स्वयंसेविका यांना **शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर, २०२६ रोजी दुपारी १.३० वाजता, संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ** येथे पाठवण्यात यावे.

वरीलप्रमाणे उपक्रमामध्ये सहभागी होण्याकरिता **https://forms.gle/KGDm8concf9EvvkC8** या गुगल लिंकद्वारे अनिवार्यपणे नावनोंदणी करणे आवश्यक आहे. सदर उपक्रमाकरिताचा प्रवास खर्च महाविद्यालयाच्या रासेयो नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा. कळावे, ही विनंती.

Bhame

**संचालक (अतिरिक्त कार्यभार)**
**राष्ट्रीय सेवा योजना**